Date
Page

# माझा छंद

प्रत्येकाकडे कोणता ना कोणता छंद असतो. माझा रिपब्लिक इंडीयन नाणी व नोटांचा संग्रह आहे. व त्या जमवण्याचा छंद आहे.

माझ्या संग्रहात १९५० ते २०२३ पर्यंतची जवळजवळ सर्व नाणी (चारही मिंटची) व नोटा आहेत, तसेच ७५ विविध देशांची नाणी आहेत. विशेष प्रसंगाकरता काढली जाणारी (कॉमेमेरिटिव्ह) नाणी पण संग्रहात आहेत.

माझा हा संग्रह २०,२५ वर्षांपासून आहे. भरपूर भटकंती करून, नातेवाईक, परिचीत, व विविध प्रदर्शनातून ही नाणी व नोटा मिळवल्या आहेत.

नाणी व नोटांचा खूप अभ्यासही केला आहे. भारतात १९४९ पासून, भारतीय नोटा वापरणे चालू झाले. भारतात नोटा छापण्यासाठी चार ठिकाणी प्रेस आहेत.

१] म्हैसूर २] देवास ३] नाशिक ४] सालबोनी

भारतीय नाणी मुख्यत: दोन प्रकारात विभागली आहेत.

१) डेफिनिटिव :

३) कॉमेमोरेटीव : या प्रकारची नाणी कुणाच्या स्मरणार्थ किंवा कुठल्या विशेष कारणाकरता काढली जातात.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. १९४७ पासून १९५० पर्यंत आपण ब्रिटीश इंडीया नाणी वापरत होतो.
१५ ऑगस्टला १ ले भारतीय चलन वापरणे सुरू झाले.

१९५७ पासून १ पैसा, २ पैसे, ५ पैसे १० पैसे, २५ पैसे, ५० पैसे १ रु. = १०० पैसे ही नाणी चालू झाली.

काही वर्षे भारताने परदेशी मिंटमधून नाणी पाडून घेतली आहेत. आता भारत परदेशांकरता नाणी पाडत आहे.

भारतात चार मिंटस आहेत. ह्या सर्व मिंटसची चिन्हे ही आहेत. १) मुंबई २) कलकत्ता ३) हैद्राबाद ४) नोयडा

## स्टार ☆ (STAR) नोट

नोटा प्रिंटिंग करतांना चुकून एखादा नंबर प्रिंट झाला नाही किंवा एखादी नोट खराब झाली तर त्या नोटेऐवजी स्टार ☆ असलेली नोट घालतात. आणि १०० नोटांचे बंडल तयार करतात. त्या बंडलावरती ☆ सहीत (with ☆) असे लिहिलेले असते.

नाण्यांच्या संग्रहाची गोडी नवीन पिढीला लागावी. ह्या विषयी माझे प्रयत्न चालू आहेत.

नाण्यांवरील चिन्हे कशी ओळखावी?, त्याची वर्गवारी कशी करावी? आल्बममध्ये ती कशा प्रकारे लावावीत? ह्या बाबतीत मी मुलांना मार्गदर्शन करतो.



अशोक लकडे
औंध पुणे